जा.क्र.मुदवसुअ/प्रा/परिपत्रक/2538 /२०२४
मुख्य दक्षता व सुरक्षा अधिकारी/ प्राधिकरण, मुंबई
दि. 11/10/24

**दक्षता विभागाचे परिपत्रक -१५**

विषय- मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळ अंतर्गत कामे करताना जमिन मालकाचे ना हरकत प्रमाणपत्र घेणेबाबत.

मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळ अंतर्गत कामे करणेसाठी संबंधित जिल्हाधिकारी यांचेकडून प्रशासकीय मान्यता प्रदान केली जाते. प्रशासकीय मान्यतेमध्ये सदर कामे करतांना जमिन मालकाचे ना हरकत प्रमाणपत्र प्राप्त करुन घ्यावे असे नमूद केलेले असते.

काही प्रसंगी मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळाने मुंबई मंडळाचे ना हरकत प्रमाणपत्र प्राप्त करुन न घेता काम केले आहे अशी तक्रार या कार्यालयास प्राप्त झाली आहे. चौकशीदरम्यान असे आढळून आले आहे की, खरोखरीच काही प्रसंगी मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळाने मुंबई मंडळाचे ना हरकत प्रमाणपत्र प्राप्त करुन न घेता काम केले आहे. सदर बाब गंभीर आहे.

यास्तव सदर परिपत्रकाद्वारे असे सूचित करण्यात येते की, मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळाने कामे करताना संबंधित जमिन मालकाचे ना हरकत प्रमाणपत्र प्राप्त करुन घ्यावे व तद्नंतर कामाला सुरुवात करावी.

सदर परिपत्रकाचे काटेकोर पालन करण्यात यावे.

(विनीत अग्रवाल)
अपर पोलीस महासंचालक तथा
मुख्य दक्षता व सुरक्षा अधिकारी/प्रा.

प्रति,
मुख्य अधिकारी, मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ.
मुख्य अधिकारी, कोंकण गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ.
मुख्य अधिकारी, मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळ मंडळ.
मुख्य अधिकारी, मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ.
मुख्य अधिकारी, पुणे गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ.
मुख्य अधिकारी, नाशिक गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ.
मुख्य अधिकारी, अमरावती गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ.
मुख्य अधिकारी, छत्रपती संभाजीनगर गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ.
मुख्य अधिकारी, नागपूर गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ.

प्रत: उपाध्यक्ष/ प्राधिकरण यांना माहितीसाठी.